प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. 21.06.2018**

# नवी मुंबईतील मालमत्ता व्यवहार व अनुषंगिक सेवांसाठी सिडकोतर्फे ऑनलाईन नागरी सुविधा प्रणाली सुरू

सिडको महामंडळातर्फे दैनंदिन कामकाजांशी संबंधित प्रक्रिया सहजसोप्या व्हाव्यात तसेच नवी मुंबईतील नागरिकांना गुणवत्तापूर्ण आणि जलद सेवा पुरवण्याकरीता ई-शासन प्रक्रियेचा भाग म्हणून **ऑनलाइन सीएफसी सिस्टिम** अर्थात **ऑनलाईन नागरिक सुविधा** सुरू करण्यात आली आहे. वसाहत सेवांकरीता तयार करण्यात आलेल्या या ऑनलाइन सेवेमुळे विविध विभांगांशी संबंधित सेवा एक खिडकी योजनेप्रमाणे एकाच ठिकाणी तेसुद्धा घरबसल्या मिळणे शक्य होऊन नागरिकांचा वेळ आणि श्रम या दोन्हींची बचत होण्यास मदत होईल.

सुरुवातीस ही सुविधा केवळ सिडको निर्मित इमारतींपुरती मर्यादित असेल; परंतु त्यानंतर तिचा विस्तार निविदा प्रक्रियेद्वारे आणि सहकारी संस्थांच्या भूखंडांवर बांधण्यात आलेल्या इमारती, दुकाने, कार्यालये यांसाठीही केला जाईल. या सुविधेमुळे आता अर्जदार नागरिकांना वसाहतींशी संबंधित विविध सेवा जसे, कर्ज घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र, मालमत्ता हस्तांतरण, मुदतवाढ, अन्य विविध प्रकारची ना हरकत प्रमाणपत्रे इत्यादींकरीता ऑनलाइन अर्ज सादर करता येईल.

अर्जदाराला www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील दुव्यावर क्लिक करून मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी इ. आवश्यक ती माहिती भरावी लागेल. त्यानंतर डिस्प्ले होणाऱ्या ड्रॉप डाउन मेन्युवरील मालमत्ता आणि हवी असलेली सेवा यांची निवड अर्जदाराला करावी लागेल. अर्जदाराला पोच म्हणून एसएमएस आणि ई-मेलद्वारे विशिष्ट सीएफसी क्रमांक पाठवला जाईल. त्यानंतर अर्जदाराला पुढील पाच दिवसांत (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) संबंधित नोडल कार्यालयात पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी लागतील.

तसेच अर्जदाराला या ऑनलाईन सेवेच्या माध्यमातून आपल्या अर्जाची सद्यस्थिती जाणून घेता येईल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको